
20 JUL 2026
तरुण भारत



कोल्हापूर : ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांनी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना पुस्तके भेट दिली.

# कुलगुरूंच्या भेटीने भारावले ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शनिवारी ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांची सदिच्छा भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. कुलगुरूंच्या या अचानक भेटीमुळे ज्येष्ठ साहित्यिक नलगे भारावून गेले. कुलगुरु कामत यांनी नलगे यांची त्यांच्या कोतोली येथील निवासस्थानी भेट घेतली. कुलगुरू डॉ. कामत यांनी नलगे यांच्या साहित्यिक योगदानाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाच्या 'कमवा आणि शिका" या योजनेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल तसेच अन्य जुन्या आठवणींविषयी बोलताना चंद्रकुमार नलगे यांना गहिवरुन आले. विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून आपण इतक्या आस्थेने विचारपूस करण्यासाठी आलात, असे म्हणत असताना त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. त्यांनी आपली काही निवडक पुस्तके कुलगुरूंना भेट दिली. यावेळी प्रदीप नलगे, अनिता नलगे आणि विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

20 JUL 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कामकाजासाठी एआय प्रणाली विकसित करू

## कुलगुरू डॉ. कामत : शिवाजी विद्यापीठात 'एआय' वापराबाबत कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजासाठी स्वतंत्र, सुरक्षित व कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित प्रणाली लवकरच विकसित करणार असून, ती विद्यापीठाच्या स्वतःच्या सर्व्हरवर कार्यरत राहील, अशी घोषणा कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केली. प्रशासन, अध्यापन, संशोधन, नवोपक्रम व विद्यार्थी सेवा या पाच प्रमुख क्षेत्रांत ही प्रणाली उपयुक्त ठरणार असून, विद्यापीठाच्या कामकाजाला अधिक वेग, अचूकता व पारदर्शकता मिळेल, असेही



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात 'एआय' वापर कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत.

त्यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठात अधिकारी, अधिष्ठाता, संचालक, कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी झालेल्या 'एआय' वापर कार्यशाळेत ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. कामत म्हणाले, 'विद्यापीठातील बैठकीच्या नोंदी, नियमावली, अधिनियम, अध्यादेश व विविध प्रशासकीय कागदपत्रांचे विश्लेषण करण्यासाठी वेळ खर्च होतो. एआयच्या मदतीने या कागदपत्रांचे अचूक विश्लेषण, संदर्भाधारित नोंदी, नियमांची पडताळणी आणि आवश्यक माहिती स्वयंचलितपणे उपलब्ध होईल. ही प्रणाली विद्यापीठाच्या सर्व्हरवर कार्यरत असल्याने डेटा सुरक्षा गोपनीयतेलाही प्राधान्य दिले जाईल.

टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेडचे वरिष्ठ एआय अधिकारी बळवंत गोरड यांनी संस्थांच्या स्वतःच्या डेटावर आधारित स्थानिक सर्व्हरवरील एलएलएम प्रणालीमुळे गोपनीयता राखत प्रशासकीय कामकाज, संशोधन, परीक्षा, वित्त, मानव संसाधन व विद्यार्थी सेवा अधिक कार्यक्षम करता येतात, असे सांगितले. सर्क्युलरचे सारांश, मीटिंगचे इतिवृत्त, पत्रलेखन, बजेट विश्लेषण, टेंडर मसुदे तसेच नॅक व एनआयआरएफसाठी आवश्यक दस्तऐवजीकरण एआयच्या मदतीने अल्पावधीत तयार करता येते, याचे त्यांनी प्रात्यक्षिक सादर केले.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होते.

### प्रणाली अध्यापन, संशोधनातही उपयुक्त

**डॉ. कामत म्हणाले, 'ही प्रणाली केवळ प्रशासनापुरती मर्यादित न राहता अध्यापन, संशोधन आणि विद्यार्थी सेवांमध्येही उपयुक्त ठरणार आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, संदर्भग्रंथ, संशोधन साधने आणि प्रकल्पांसाठी आवश्यक माहिती सहज उपलब्ध होईल. तसेच फ्लिप्ड क्लासरूम, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम, ओपन एज्युकेशन मॉडेल व डिजिटल लायब्ररीला यामुळे चालना मिळेल.'**

20 JUL 2026
जनसंपर्क कक्ष
तरूण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात लवकरच एआय प्रणाली



कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत सोबत डॉ. केदार मारुलकर, बळवंत गोरड, प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील.

## कुलगुरू डॉ. कामत यांची घोषणा

प्रतिनिधी ,कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजासाठी स्वतंत्र व सुरक्षित कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रणाली लवकरच विकसित करणार असल्याचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केली.

शिवाजी विद्यापीठात आयोजित एआय वापराबाबत विशेष कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेत टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ एआय अधिकारी बळवंत गोरड, प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव व वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. कामत म्हणाले, प्रशासन, अध्यापन, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थी–सुविधा या पाच प्रमुख क्षेत्रांमध्ये ही प्रणाली उपयुक्त ठरणार असून, विद्यापीठाच्या कार्यपद्धतीला अधिक वेग, अचूकता आणि कार्यक्षमतेची दिशा मिळणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे तांत्रिक पथक, आयटी सेल व संबंधित तज्ज्ञांच्या सहकार्याने विकसित होणारी प्रणाली विद्यापीठाच्या डिजिटल परिवर्तनातील महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बळवंत गोरड यांनी शैक्षणिक संस्थांसाठी एआय प्रणाली अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. समन्वयक डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले.

लक्षवेधी

आहार व मानसोपचार तज्ज्ञांचा खेळाडूंना सल्ला : उत्तेजक द्रवे शरीरासाठी धोकादायक असल्याचे दिले पटवून

# सकस आहार, विश्रांती घ्या, डोपिंगपासून दूर रहा





**कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण आधीविभागाने आयोजित क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण व डोपिंग या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर कार्यक्रमात बोलताना पोषणतज्ज्ञ अवंती दामले. दुसऱ्या छायाचित्रात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध खेळांचे आठशेहून अधिक खेळाडू.**

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

खेळासाठी ऊर्जा देईल असाच आहार घ्या, दोन–पाच मिनिटात बनणारे पदार्थ खाणे टाळा, खेळाचा सामना झाल्यानंतर शरीराची रिकव्हरी करुन स्नायूंना विश्रांती द्या, मी सामन्यात उत्कृष्ट खेळणार, मी जिंकणार, मी स्पर्धेतील यशासाठी शरिराचे अवयव बरबाद करणारे उत्तेजक द्रवे घेणार नाही, सामना खेळण्यापूर्वी माझा आत्मविश्वास वाढतोय असा विचार करा यासह अनेक मौलिक सल्ले आहार व पोषणतज्ज्ञ अवंती दामले व मानसोपाचर तज्ज्ञ व समुपदेशक डॉ. यशवंत वेलणकर यांच्याकडून वेगवेगळ्या खेळांच्या खेळाडूंना शनिवारी मिळाले.

निमित्त होते क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण व डोपिंग या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे. शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात झालेल्या झालेल्या या कार्यक्रमाला आठशेहून अधिक महिला व पुरुष खेळाडू उपस्थित होते. विद्यापीठाच्याच क्रीडा व शारीरिक शिक्षण आधीविभागाने व्याख्याने आयोजित केली होती. उत्तेजक द्रव्यांचे दुष्परिणाम व सकस आहाराबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. राजनिश कामत होते. त्यांनी बोलताना सांगितले की खेळाडूंमध्ये आहार, सराव, विश्रांती व उत्तेजक द्रव्ये याबाबत जागृती करण्यासाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केला आहेत. उत्तेजक द्रवे घेणाऱ्या खेळाडूंना भविष्यात वाईट परिणामांना सामोरे जावे लागू शकते हे लक्षात घ्यावे.

यानंतर अवंती दामले यांनी डोपिंग अँण्ड स्पोर्टस् न्युट्रीशन या विषयावर मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, खेळाडू ज्या खेळाचा सराव करतात, अथवा सामना खेळतात, त्याला रोज घेतला जाणारा आहार किती प्रतिसाद देतो हे फार महत्वाचे आहे. कारण सकस आहार मैदानात पूर्ण क्षमतेने खेळण्यास मदत करतो. जिवस, तीळ खात रहा, पनीर (घरी बनवले तरच), अंडी, गाजर, फळे, मटण, चिकणही सतत खात रहा. तळलेले पदार्थ कमी खा. उत्तेजक द्रव्ये घेऊन मैदाना उतरु नका. ही द्रवे किडणी, लिव्हरसह शरीराला निकामी करतात. सप्लीमेंटची गरज असेल तर घ्यावे, असेही दामले यांनी सांगितले.

डॉ. यशवंत वेलणकर म्हणाले, खेळाडू सराव करताना अथवा सामना खेळताना सकारात्मक विचार करतो तो नकारात्मक विचार करतो हे महत्वाचे आहे. यामुळे खेळाडूंनी मी खेळावर लक्ष देणार, मी जिंकणार, माझा आत्मविश्वास वाढतोय, असा विचार करावा. उत्तेजक द्रव्ये धोकादायक ठरू शकतात याचे भान खेळाडूंनी ठेवावे, असेही डॉ. वेलणकर यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाच्या प्र–कुलगुरु प्रा. डॉ. ज्योती जाधव, व जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस उपस्थित होत्या. क्रीडा व शारीरिक शिक्षण आधीविभागाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले आहे. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. किरण पाटील यांनी आभार मानले.

20 JUL 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंसाठी मानसशास्त्र, नैतिकता महत्वाची

## क्रीडा आहारतज्ज्ञ अवंती दामले : 'क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण आणि डोपिंग'वर चर्चासत्र

**जनप्रवास : कोल्हापूर**

खेळाडूंनी जागरूक राहून मानसशास्त्र आणि नैतिकता या महत्वाच्या गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन क्रीडा आहारतज्ज्ञ अवंती दामले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात 'क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण आणि डोपिंग' या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी क्रीडा आहारतज्ज्ञ दामले मार्गदर्शन करीत होत्या. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची उपस्थिती होती.

क्रीडा आहारतज्ज्ञ दामले म्हणाल्या, आपल्या देशाला जागतिक स्तरावर मान्यता मिळण्यासाठी खेळाडूंना प्रोत्साहित करणे महत्वाचे आहे. येणार पुढील काळ हा खेळासाठी आणि खेळाडूंसाठी अत्यंत पोषक आहे. देशाला पुढे घेवून जाण्यासाठी खेळाडूंनी स्वतःमध्ये बदल करणे आवश्यक आहे. अन्न हे आपले पोषक घटक आहे. परंतू, आपण त्याला फारसे महत्व देत नाही. फक्त



आपल्या जिभेचा विचार करतो, आरोग्याचा विचार करीत नाही. खेळाडूंनी याच गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष केंद्रीत करणे महत्वाचे आहे. आपला आहार आपल्या खेळास सहायय करणारा असणे गरजेचे असते. सामना असो वा नसो खेळातील गुणवत्ता उंचावण्यासाठी सातत्याने सराव करणे आवश्यक आहे. शरीराची झिज भरून काढण्यासाठी झोप महत्वाची आहे. त्याचबरोबर, स्मार्टफोनवर लगाम ठेवणेही गरजेचे आहे. उत्कृष्ट खेळाडू घडण्यासाठी अनुशासन, निष्ठा आणि समर्पण अत्यंत महत्वाचे आहे. डाळी, कडधान्य, भरडधान्य, मध, दूध, गूळ, बटाटा यामध्ये कार्बोहायड्रेडस् मोठ्या प्रमाणात मिळतात. त्याचा आहारामध्ये निश्चित समावेश करावा. दररोज योग्य प्रमाणात पाणी पिणे महत्वाचे असते. जे पदार्थ हृदय, किडनी आणि हाडांवर दुष्परिणाम करतात आणि ज्या पदार्थांवर बंदी आहे त्यापासून खेळाडूंनी दूर राहिले पाहिजे. आपण अविचाराने कृती करणार नाही हे निश्चित केले पाहिजे.

फिजिओथेरपिस्ट डॉ. यशवंत वेलणकर म्हणाले, खेळात यश प्राप्त करण्यासाठी खेळाडूंची मानसिक आणि भावनिक तयारी अत्यंत महत्वाची असते. खेळाच्या मैदानावर अन्य कारणांमुळे मानसिकता खराब झाली असेत तर ती त्वरित स्थिर करण्याचा प्रयत्न करावा. यासाठी आवश्यक असणाऱ्या काही सोप्या व्यायाम प्रकाराचा सराव करावा. डोपिंगचे दुष्परिणाम दीर्घकालीन असतात. खेळ बाजूलाच राहते आणि मनुष्य सामान्य आयुष्य सुध्दा जगू शकत नाही. म्हणूनच, खेळाडूंनी एकाग्रता वाढविण्याचे कौशल्ये आत्मसात करावीत.

व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, खेळाडूंची मानसिकता उत्तम राहण्यासाठी पोषण आणि पोषणमूल्य महत्वाचे आहेत. गैरप्रकाराने यश मिळविणे हे चुकीचे आहे. खेळताना खेळाडूंचे लक्ष विचलित हाऊ नये यासाठी एकाग्रता आवश्यक असते. खेळाचे मानसशास्त्र खेळाडूंना त्यांचे ध्येय निश्चित करून त्यावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते. खेळताना अनेक प्रकारच्या भावना निर्माण होतात या भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. स्वागत क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.एन. डी.पाटील आणि अजय मराठे यांनी केले तर डॉ. किरण पाटील यांनी आभार मानले.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस यांचेसह क्रीडा प्रशिक्षक सविता भोसले, डॉ. अतुल टोने, डॉ. कृष्णात पाटील, डॉ. सुजित नाईक, डॉ. आकाश बनसोडे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. धनंजय पाटील, डॉ. रामचंद्र पाटील, डॉ. विजय रोकडे, डॉ. विकास जाधव, डॉ. सुनिल खराडे, डॉ. महेश पाटील, विद्यार्थी, विद्यार्थींनी, पालक आणि क्रीडाप्रेमी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

20 JUL 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंसाठी मानसशास्त्र आणि नैतिकता महत्त्वाची

## ■ आहारतज्ज्ञ अवंती दामले

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**खेळाडूंनी जागरूक राहून मानसशास्त्र आणि नैतिकता या महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन क्रीडा आहारतज्ज्ञ अवंती दामले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात 'क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण आणि डोपिंग' या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची विशेष उपस्थिती होती.**

क्रीडा आहारतज्ज्ञ दामले म्हणाल्या, पुढील काळ हा खेळासाठी आणि खेळाडूंसाठी अत्यंत पोषक आहे. देशाला पुढे घेऊन जाण्यासाठी खेळाडूंनी स्वतःमध्ये बदल करणे आवश्यक आहे. अन्न हे आपले पोषक घटक आहे; परंतु आपण त्याला फारसे महत्त्व देत नाही. फक्त आपल्या जिभेचा विचार करतो, आरोग्याचा विचार करीत नाही. सामना असो वा नसो, खेळातील गुणवत्ता उंचावण्यासाठी सातत्याने सराव करणे आवश्यक आहे. शरीराची झीज भरून काढण्यासाठी झोप महत्त्वाची आहे. उत्कृष्ट खेळाडू घडण्यासाठी अनुशासन, निष्ठा आणि समर्पण अत्यंत महत्त्वाचे आहे.

फिजिओथेरपिस्ट व सल्लागार डॉ. यशवंत वेलणकर म्हणाले, खेळात यश प्राप्त करण्यासाठी खेळाडूंची मानसिक आणि भावनिक तयारी अत्यंत महत्त्वाची असते.

व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे म्हणाले, खेळाचे मानसशास्त्र खेळाडूंना त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्यास आणि आत्मविश्वासाने खेळण्यास मदत करते.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, गैरप्रकाराने यश मिळविणे हे चुकीचे आहे. खेळाचे मानसशास्त्र खेळाडूंना त्यांचे ध्येय निश्चित करून त्यावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते. खेळताना अनेक प्रकारच्या भावना निर्माण होतात. या भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते.

स्वागत व प्रास्ताविक क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे व सूत्रसंचालन डॉ. एन. डी. पाटील आणि अजय मराठे यांनी केले, तर डॉ. किरण पाटील यांनी आभार मानले.

यावेळी जिल्हा क्रीडाधिकारी विद्या शिरस, क्रीडा प्रशिक्षक सविता भोसले, डॉ. अतुल टोने, डॉ. कृष्णात पाटील, डॉ. सुजित नाईक, डॉ. आकाश बनसोडे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. धनंजय पाटील, डॉ. रामचंद्र पाटील, डॉ. विजय रोकडे, डॉ. विकास जाधव, डॉ. सुनील खराडे, डॉ. महेश पाटील आदी उपस्थित होते.

20 JUL 2026

सकाळ

# संवाद कौशल्य प्रभावी प्रशासनाची गुरुकिल्ली : डॉ. आलोक जत्राटकर

■ सकाळ वृत्तसेवा



डॉ. जत्राटकर

कोल्हापूर, ता. १९ : 'आपण ज्या संस्थेत कार्यरत आहोत, त्या संस्थेची उद्दिष्टे, कार्यपद्धती, नियम आणि विविध उपक्रमांची अचूक माहिती प्रत्येक कर्मचाऱ्याला असणे आवश्यक आहे. विद्यार्थी, पालक आणि अभ्यागतांशी सकारात्मक व परिणामकारक संवाद साधण्याची क्षमता ही प्रभावी प्रशासनाची गुरुकिल्ली आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे हंगामी रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी 'प्रशासकीय साक्षरता आणि जीवन कौशल्ये' या विषयावरील उद्‌बोधन वर्ग मानव्यविद्या सभागृहात घेण्यात आला. यावेळी 'शिवाजी विद्यापीठ आणि संवाद कौशल्य' या विषयावर डॉ. जत्राटकर यांनी मार्गदर्शन केले.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षस्थानी होते. त्यांनी 'प्रशासकीय साक्षरता आणि जीवन कौशल्ये' या विषयावर मार्गदर्शन केले. कोर्स को-ऑर्डिनेटर नाझिया मुल्लाणी यांनी प्रवेश प्रक्रियेची माहिती दिली.

यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, चांगदेव बंडगर, नितीन रणदिवे, विश्वनाथ वरुटे, रूपाली बन्ने, तेजस्विनी शिंदे, दयानंद गावडे उपस्थित होते. संजय चोपडे यांनी स्वागत केले. नगीना माळी यांनी सूत्रसंचालन केले. सुमन लोहार यांनी आभार मानले.

20 JUL 2026

सकाळ

# डॉ. निवास माने यांना पीएच.डी.



डॉ. निवास माने

कोडोली : कोडोली गावचे सुपुत्र व शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी तथा उपकुलसचिव डॉ. निवास माने यांना 'उच्च शिक्षणातील संगणकीकरण' या विषयावरील संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. माने यांच्या संशोधन कार्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. चिंतामणी काळे, डॉ. केदार माहुलकर, परीक्षा संचालक डॉ. अजित जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
20 JUL 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : अखिल भारतीय मराठा महासंघ व मराठा स्वराज्य भवन ट्रस्टच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार करताना मान्यवर.

# मराठा समाजाने शिक्षण प्रवाह सोडू नये

## वसंतराव मुळीक : मराठा महासंघातर्फे गुणवंतांचा सत्कार

प्रतिनिधी ,कोल्हापूर

कुटूंबाच्या सुरक्षिततेसाठी शिक्षण गरजेचे आहे. मराठा समाजातील युवकांनी चुकीच्या विचारांना बळी पडुन भरकटून न जाता शिक्षणाचा प्रवाह सोडू नये, असे प्रतिपादन मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक यांनी केले.

अखिल भारतीय मराठा महासंघ व मराठा स्वराज्य भवन ट्रस्टच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. प्रल्हाद जाखले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात सर्व समाजातील दहावीत ९० टक्के व बारावीत ८५ टक्क्याहून अधिक गुण प्राप्त केलेल्या १०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत पाटील यांनी प्रास्ताविक केले. शहराध्यक्ष निलेश पाटील यांनी स्वागत केले. सी. एम. गायकवाड, डी. ए. पाटील यांनी सुत्रसंचलन केले. शैलजा भोसले यांनी आभार मानले. यावेळी शंकरराव शेळके, चंद्रकांत चव्हाण, दीपा डोणे, उद्योजक जयेश कदम, डॉ. विद्या साळोखे, बबीता जाधव, वैजयंती साळुंखे, महेश जाधव, प्रतिक साळुंखे, जयसिंग हवालदार, सुर्यभान इंगळे आदी उपस्थित होते.

### शिक्षणाची वाटचाल मजबूत करावी

छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीही जातपात मानली नाही. सर्वांना सोबत घेवून स्वराज्याचा लढा दिला. मात्र, युवकांच्या मनात वेगळेच विचार पसरविण्याचा प्रयत्न होत आहे. अशा विचारांना युवकांनी थारा न देता शिक्षणाची वाटचाल अधिक मजबूत करावी, असे आवाहन मुळीक यांना उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

20 JUL 2026
तरुण भारत

# 'पंचगंगा' व्यवस्थापनासाठी युवा संशोधकांची गरज

प्रतिनिधी ,कोल्हापूर

सीईओ डॉ. जॅस्मिन :

विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात एम.एस्सी विद्यार्थ्यांचे स्वागत

युवा संशोधकांनी अंधश्रद्धेपासून दूर राहून वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगला पाहिजे. पंचगंगा, कचरा व्यवस्थापनासाठी युवा संशोधकांची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या सीईओ डॉ. जॅस्मिन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील एम. एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे होते. सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजचे डॉ. सुनील कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. सुनील कुलकर्णी यांनी संशोधनाचे महत्त्व विषद केले. प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी निम करोली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट आणि विभागाच्या माध्यमातून रंकाळा प्रदूषण व जल व्यवस्थापनासारख्या सामाजिक प्रश्नांवर सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाने पीआयएफसी सेंटरच्या माध्यमातून आतापर्यंत १५ हजारपेक्षा जास्त सॅम्पल्स स्कॅन करून विद्यापीठाला लक्षणीय महसूल मिळवून दिला आहे. विभागाचे १५० पेक्षा जास्त विद्यार्थी दक्षिण कोरिया आणि इतर देशांत संशोधनासाठी गेले असून ते विभागाचे 'रिसर्च अम्बेसिडर्स' म्हणून काम करत आहेत, असे प्रा. डॉ. केशव राजपुरे यांनी सांगितले.